Impact Factor – 6.261
ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
February - 2019
SPECIAL ISSUE- 135 (C)

# आधुनिक मराठी साहित्य : विविध प्रवाह



**Guest Editor :**
Dr. R. S. Patil
Principal,
P.S.G.V.P. Mandal's S.I.P. Arts, G.B.P. Science &
S.T.K.V.S. Commerce College, Shahada
Dist. Nandurbar [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue :**
Prof. Pankaj Shirsale
Head, Dept. of Marathi
P.S.G.V.P. Mandal's S.I.P. Arts, G.B.P. Science &
S.T.K.V.S. Commerce College, Shahada
Dist. Nandurbar [M.S.] INDIA

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | ख्रिस्तपुराण : स्वरूप, विशेष आणि तत्कालीन योगदान | प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे | 07 |
| 2 | मराठीतील ग्रामीण साहित्य प्रवाह : एक चिंतन | डॉ. जितेंद्र गिरासे | 14 |
| 3 | मराठी साहित्यातील क्रांतीदर्शी विचारांची यात्रा : दलित साहित्यप्रवाह | प्रा. धनाजी भिसे | 18 |
| 4 | मुस्लीम कवितेतील सामाजिक बांधिलकी | प्रा. युवराज भामरे | 24 |
| 5 | कोल्हाट्याचं पोर' एक सामाजिक दस्तऐवज | प्रा. पंकज शिरसाळे | 31 |
| 6 | दलित स्त्री लेखिकांचे लेखन | प्रा. देवेंद्र निकम | 33 |
| 7 | आधुनिक आदिवासी मराठी साहित्याची समीक्षा | प्रा. ज्ञानेश्वर म्हात्रे | 38 |
| 8 | स्त्रीवादी साहित्य प्रवाह | प्रा. मनीषा डोंगरे | 42 |
| 9 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोककला | डॉ. सी. एस. करंके | 45 |
| 10 | मराठी ग्रामीण साहित्याचा प्रवाह | डॉ. देविदास शेटे | 48 |
| 11 | दलित स्त्री आत्मकथनातील जीवनदर्शन | डॉ. भारती बेंडाळे | 55 |
| 12 | मराठी साहित्यातील स्त्रीवादाचे स्वरूप व जाणीवा | डॉ. दिनेश पाटील | 59 |
| 13 | अहिराणी ओवीगीतातील स्त्रीवादी चिंतन | डॉ. सुधा खराटे | 62 |
| 14 | आदिवासी काव्यप्रवाहाचे स्वरूप | प्रा. गौतम थोरात | 66 |
| 15 | ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा | डॉ. हिरालाल पाटील | 71 |
| 16 | १९९० नंतरची दलित कथा | ज्योत्स्ना इंगळे | 74 |
| 17 | आदिवासी साहित्य प्रवाहाचे योगदान | कुंडलिक पारधी | 9 |
| 18 | मुस्लिम मराठी साहित्य प्रवाह आणि मराठी कथा | डॉ. प्रशांत लगडे | 84 |
| 19 | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी : एक चिंतन | डॉ. रजनी लुंगसे | 89 |
| 20 | ग्रामीण कवी ना.धों.महानोर आणि केदारनाथ सिंह यांच्या कवितेतील निसर्गचित्रण | महेश रणदिवे | 92 |
| 21 | मराठी साहित्यातील स्त्रीवाद | प्रा. मंगला चौधरी | 97 |
| 22 | ग्रामीण कादंबरी साहित्य प्रवाह | प्रा. निलेश लंगोटे | 100 |
| 23 | दलित साहित्य आणि घटनात्मक मूल्ये | डॉ. प्रकाश भामरे | 108 |
| 24 | एका पुरुषाने स्त्रीवादी दृष्टीकोनातून स्त्रीमनाचा घेतलेला शोध म्हणजे 'आई रिटायर होतेय' हे नाटक | प्रा. मंगला पाटील | 112 |
| 25 | मराठीतील विज्ञान साहित्य प्रवाह | प्रा. प्रिया नेर्लेकर | 115 |
| 26 | दलित साहित्याची संकल्पना व स्वरूप | पूनम गोसावी | 128 |
| 27 | वाहरू सोनवणे- आदिवासी साहित्य प्रवाहातील एक नामवंत कवी | डॉ. रविंद्र पाटील | 133 |
| 28 | मराठी ग्रामीण साहित्य प्रवाह | डॉ. राजेंद्र काकुस्ते | 137 |
| 29 | आनंद यादव यांच्या कादंबरीतील ग्रामीणता (गोतावळा) | प्रा.राजेंद्र निकुंभे | 140 |
| 30 | खानदेशातील दलित स्त्रियांच्या ओवीगीतातील भावविश्व | डॉ. रत्ना जवरास | 144 |
| 31 | स्त्रीवादी साहित्य | डॉ. विठ्ठल केदारी | 152 |
| 32 | आदिवासी लोककलेची विविध रूपे | डॉ. राखी सलगर | 156 |
| 33 | ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता आणि सामाजिक दृष्टीकोन | प्रा. संगिता आहिरे | 159 |
| 34 | आदिवासी साहित्य प्रवाह | डॉ. संजय महाले | 163 |
| 35 | आधुनिक मराठी साहित्य प्रवाह : विज्ञान साहित्य | डॉ.संजय शिंदे | 168 |
| 36 | आदिवासी कवितेतील विद्रोह | डॉ. सुधाकर बोथीकर | 174 |

# मराठी ग्रामीण साहित्य प्रवाह

**डॉ. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते**
मराठी विभाग प्रमुख
वि.वि.मं.चे कला व वाणिज्य महाविद्यालय,
अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार.

मराठी साहित्यात मध्ययुगिन काळापासून विविध प्रवाह अस्तित्वात होते. त्यात संत-पंत-तंत असे मुळ प्रवाह दिसून येतात. या प्रवाहातून त्या-त्या काळातील समाज व्यवस्थेचे दर्शन घडते. पेशवाईच्या शेवटाबरोबर इंग्रजी राजवटीला सुरुवात झाली. त्यानंतर इंग्रजांनी शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणलेत. तत्कालीन भारतीय सुशिक्षित तरुण इंग्रजी ज्ञानाने प्रभावित होऊन इंग्रजी साहित्याचे अध्ययन करु लागले. "साहित्य हा मानवी जीवनाचा आरसा असतो". या नियमानुसार पाश्च्यात्य समाज व्यवस्थेचे चित्रण इंग्रजी ग्रंथातून अभ्यासले जाऊ लागले. त्या समाजव्यवस्थे बरोबर भारतीय पारंपारिक समाज व्यवस्थेशी तुलना करु लागली. दोन्ही समाज व्यवस्थेत मोठी तफावत दिसून आली. आपली समाज व्यवस्था पारंपरिक रुंढी, परंपरा, संस्कृती यात गुरफटलेली तर पाश्चात्य समाज व्यवस्था मुक्त व आधुनिक विचारांची. आपला समाज सुधारावा या विचाराने प्रेरीत होऊन आधुनिक विचारांची तरुण पिढी समाज प्रबोधनाच्या तळमळीतून साहित्याच्या विविध प्रकारातून लिहू लागली. त्यातून ग्रामीण साहित्यासारखा नवा वाङ्.मय प्रवाह उदयास आला.

मराठी साहित्यातील ग्रामीण नावाने ओळखला जाईल अशा प्रकारच्या लेखनाची सुरुवात प्रथम १८५० ते १८८० च्या काळात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या लेखनाने झालेली आहे. त्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकातून शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे वर्णन केलेले असून त्यातून ग्रामीण समाजातील विविधस्तरावर खेडयातील कारभार पाहणारे कुलकर्णी, पाटील व इंग्रज अधिकारी शेतकऱ्यांचे शोषण कसे करतात, शेतकऱ्यांची दयनीय स्थिती सुधारण्यासाठी कोणती उपाययोजना करायला हवी याचे मार्गदर्शन या ग्रंथातून केले आहे. तसेच 'ब्राम्हणांचे कसब', 'गुलामगिरी', 'इशारा', 'तृतिय रत्न' इ. ग्रंथातून तत्कालीन ग्रामीण जीवनाचे व समस्यांचे चित्रण म. फुलेंनी केले आहे. यावरुन ही ग्रामीण साहित्याची सुरुवातच म्हणावी लागेल. ती प्रतिनिधीक स्वरुपाची होती.

महात्मा फुलेंच्या नंतर १८९७-९८ पर्यंत फारसे ग्रामीण साहित्य लिहीलेले दिसत नाही. मात्र आपल्या देशात १८९७ साली आलेल्या दुष्काळावर आधारीत हरिभाऊ आपटे यांनी "काळ तर मोठा कठीण आला" ही दीर्घ कथा लिहीली. त्या संदर्भात मत मांडतांना डॉ. आनंद यादवांना तो एक वाड.मयीन अपघात वाटतो. त्यानंतर १९०३ साली रा. वि. टिकेकर यांची खेडयातील ग्रामीण वास्तव्य चितारणारी 'पिराजी पाटील' ही छोटेखाणी ग्रामीण कादंबरी प्रसिध्द झाली. ती महाराष्ट्रातील ग्रामीण वास्तवाचे दर्शन घडवणारी मराठी साहित्यातील निखळ ग्रामीण जीवन चितारणारी कादंबरी ठरली. यानंतर देशात स्वातंत्र्य लढा तीव्र झाला. तसेच मध्यमवर्गीय समाजासाठी तो काळ समाज प्रबोधनाचा होता. त्यामुळे ग्रामीण साहित्य निर्मितीत खंड पडलेला दिसतो.

भारत हा मुळात खेडयात वसलेला देश आहे. भारतीय संस्कृती ही ग्रामीण जीवनातंच सामवेलेली असल्याने ग्रामीणतेच्या जाणीवा ज्या साहित्यात उमटलेल्या दिसून येतात तेच ग्रामीण साहित्य होय. १९२० नंतर भारतीय राजकारण म. गांधीजींच्या विचाराने व कार्याने प्रभावित झाले म. गांधीजींनी 'खेडयाकडे चला' अशी हाक दिल्यावर त्यांच्या विचाराने प्रभावित झालेल्या तरुण क्रांतीकारकांबरोबर साहित्यिकही खेडयातील जन जीवनाचा अभ्यास करु लागले आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव घेऊन तेथील जीवन साहित्यातून चितारु लागले. ग्रामीण जीवनातील सुख-दुःख, चढ-

उतार, स्थिती-गती यांचा आविष्कार साहित्यातून मांडू लागले. ग्रामीण जीवनाशी निगडीत असणारी कृषी केंद्रीत अर्थव्यवस्था, शेतीत राबणारे मजूरांचे जीवन, पशु-पक्षी इ. ची जीवन निष्ठा, सुख दुःखात्मक भावना, ग्रामीण भागातील गोरबांवर होणारे अन्याय व अत्याचार, जमीनदार व वेठबिगार, तेथील समाज व्यवस्था, ग्रामीण जीवनातील लोकसंस्कृती, त्यांचे सण-उत्सव, शेतीशी निगडीत आणि पावसावर आधारित शेतीवर जीवन जगणारी धडपडणारी माणसे, त्या-त्या प्रदेशात बोलली जाणारी प्रादेशिक भाषा या सर्वांचे चित्रण ग्रामीण साहित्यात येते.

ग्रामीण संस्कृती आणि कृषी केंद्रीत अर्थव्यवस्था, विशिष्ट प्रदेश आणि तेथील प्रादेशिकतेनुसार असणाऱ्या चालीरिती, आर्थिक व सामाजिक व्यवस्था, वैज्ञानिक ज्ञाना बाबत असणारे मागसलेपणा व ते जाणून घेण्याबाबतची उदासिनता यामुळे येणारे दारिद्रय व मर्यादा या सर्वातून मानवी जीवनामुळे उभे राहणारे प्रश्न या सर्वांचा समावेश ग्रामीण जीवनावर होत असतो . एका भू-भागात ग्रामीण जनतेची वस्ती असते, तेथील निसर्ग आणि शेती यावर आधारित असा कृषक समाज तेथे वास्तव्य करीत असतो. कृषी जीवनाशी निगडीत व आवश्यक असणारे गाय, बैल, म्हैस, घोडा, कुत्रा, कोंबडया इ. पाळीव पशु-पक्षी यासर्वांचा एक कृषक परिवार असतो. या सर्वांचे चित्रण ग्रामीण साहित्यात येत असते.

शहरी संस्कृती ही विविधतेने संपन्न आणि व्यापार उदयोगांनी नटलेली आहे. पण ग्रामीण जीवनाची यथार्थता यापेक्षा वेगळी आहे. ग्रामीण संस्कृती व ग्रामव्यवस्था अगदी फार पूर्वीपासूनच एका विशिष्ट स्वरुपांची असल्याचे दिसते. ग्रामीण संस्कृतीचे वैशिष्टये असे सांगता येईल की, पूर्वी खेडी ही आर्थिक व व्यावहारिक दृष्टया स्वयंपूर्ण होती. तसेच ग्रामीण संस्कृती आपला स्वतंत्रपणा जपणारी होती. गावचा पाटील हा गावाचा प्रमुख असायचा. तोच गावाचा कायदा आणि सुव्यवस्था पहायचा. गावातील चावडी हे मध्यवर्ती ठिकाण म्हणजे गावातील न्यायालय किंवा राजदरबार होता. ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने कृषिकेंद्रीत होती. म्हणजेच शेती भोवती आवर्तीत झालेले जीवन हेच ग्रामीण भागाचे समाज जीवन आहे. या ग्रामीण रचनेतील शेतकरी हा सर्वात प्रमुख घटक आहे. शेतकरी आणि शेती यांच्या बरोबरच शेतमजुर, आलुतेदार, बलुतेदार, पाटील, कुलकर्णी, तलाठी, ग्रामसेवक, कोतवाल इ. असे ग्रामीण जीवनाचे प्रमुख व अविभाज्य घटक आहेत. हे सर्व घटक ग्रामीण साहित्याच्या विविध साहित्य प्रकार जसे कथा, कादंबरी, कविता, नाटक, जानपद गीतें, ओव्या इ. तून येतांना दिसतात. शेती ही ग्रामीण भागातील शेतकऱ्याने विकसित केली आहे. ग्रामीण जीवन शेतीशी जुळलेले आहे. गावातील सर्वच अलुतेदार, बलुतेदार हे शेतीशी जुळलेले आहे. त्यांची उपजिविका ही शेतीवर आधारितच आहे. त्यामुळे ग्रामीण कथा, कादंबऱ्या व इतर साहित्यकृतीतून शेती विषयीचे जीवनच साहित्यिकांनी मांडलेले आहे. परंपरागत शेती व्यवसाय करत असल्याने दुष्काळा सारख्या नैसर्गिक समस्यांना तोंड ग्रामीण माणसाला दयावे लागते. तेव्हा तो पोट भरण्यासाठी शहराची वाट धरतो. शहरातील वसाहतीत राहुन मिळेल ते काम करण्याची तयारी त्या ग्रामीण माणसाची असते म्हणूनच शहरे वाढतांना दिसताहेत. तेथील त्याच्या दयनीय अवस्थेचे वर्णन अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतीतून मांडलेले दिसते.

मराठी साहित्याच्या प्रवाहात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, समकालीन साहित्य इ. वाङ्.मयाचे विविध प्रवाह अस्तित्वात असले तरी मराठी ग्रामीण साहित्याची परंपरा या सर्व प्रवाहात तशी जुनीच मानली जाते. ग्रामीण साहित्य लेखनाने मराठी भाषेची व साहित्याची प्रगती झालेली असून मराठी साहित्याच्या अभिवृध्दीसाठी मोलाची भर घातलेली दिसते. ग्रामीण साहित्याविषयी प्रचलीत साहित्य प्रवाहात आजपर्यंत अनेक लेखक, अभ्यासक, समीक्षक इ. नी सखोल चिंतन केलेले आहे. तरीही ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाच्या दृष्टीने ग्रामीण साहित्याचे स्वरुप त्याची व्याप्ती तसेच ग्रामीण कथा, कादंबरी, कविता इ. साहित्य प्रकारांच्या दृष्टीने त्यातील साहित्यिक मुल्यांचा विचार केल्याशिवाय ग्रामीण साहित्याचे स्वरुप सिध्द करता येत नाही. 'ग्रामीण साहित्य' या संकल्पनेचे स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न अनेक संशोधक, अभ्यासकांनी केला आहे. "ग्रामीण साहित्यः स्वरुप आणि समस्या" या ग्रंथात डॉ. आनंद यादव म्हणतात, "ग्रामीण साहित्य ही संकल्पना एखाद्या प्रदेशांतर्गत जीवनातून निर्माण इ

लेल्या साहित्याला योजिली जाते. त्या साहित्यात त्या प्रदेशातील वास्तव जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. साहित्याचा उद्देश. निरपेक्ष व्यक्तिमत्वाचा आविष्कार गौणस्थानी केलेला असतो. त्यामुळे 'ग्रामीण साहित्य' हा ग्रामीण मनाचा, समाजाचा अनेक ताणतणावांसह शब्दरुप झालेला एक सांस्कृतिक ठेवा असतो. तो त्या प्रदेशाचा चालता-बोलता मानसिक इतिहास असतो". या विधानात डॉ. आनंद यादवांनी ग्रामीण साहित्याची स्वरुप व व्याप्ती स्पष्ट केलेली दिसते.


१९९० नंतरच्या ग्रामीण साहित्यातून जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, विज्ञान व तंत्रज्ञानाचा ग्रामीण जीवनावर व एकंदरीतच समाज जीवनातील परिवर्तनाचे वास्तव चित्रण कथा, कादंबरी, कविता आणि समीक्षा अशा विविध स्वरुपात ग्रामीणांच्या समस्या चित्रीत करणारे लेखन झाले आहे अजूनही होत आहे. अलिकडच्या ग्रामीण साहित्यात सामाजिक जबाबदारी विचारात घेऊन ग्रामीण साहित्यिक स्वतंत्र्य, बंधुता, मानवता, सामाजिक न्याय इ. मुल्यांचा स्विकार करुन ग्रामीण जीवनातील व्यथा, वेदना, समस्यांचे प्रत्ययकारी चित्रण करीत आहेत. असे प्रकर्षाने निश्चितच जाणवते.

**संदर्भ :-**

१. आनंद यादव, ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि समस्या
२. नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि शोध
३. श्रीराम गुंदेकर, ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन.

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA





Volume-VIII, Issue I
January - March - 2019
Marathi Part - II

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे राजकीय व सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक कार्यातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. प्रताप वामनराव पाटील** | १-३ |
| २ | राजर्षी शाहू महाराजांचे सत्यशोधक समाजाविषयीचे विचार - एक दृष्टीकोण<br>**प्रा. डॉ. उमेश शिवाजी पाटील**<br>**प्रा. डॉ. डी. एम. टेकाडे** | ४-८ |
| ३ | छ. राजर्षी शाहू महाराजांचा राजकिय दृष्टिकोन<br>**प्रा. दिनेश साहेबराव खंडारे** | ९-१३ |
| ४ | राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्ये<br>**प्रा. डॉ. रविंद्र दगडू वाघ** | १४-१८ |
| ५ | छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक विचार व कार्य<br>**प्रा. आर. ए. वाघ** | १९-२३ |
| ६ | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य<br>**प्रा. डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी** | २४-२७ |
| ७ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य<br>**प्रा. डॉ. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते** | २८-३१ |
| ८ | छत्रपती शाहू महाराजांच्या कृतीतील आदर्श राज्य<br>**डॉ. राजेंद्र नाडेकर** | ३२-३६ |
| ९ | राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री सुधारणाविषयीचे कार्य : एक अवलोकन<br>**प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे**<br>**प्रा. डॉ. शारदा कदम** | ३७-४० |
| १० | राजर्षी शाहू महाराजांचे जाहीरनामे, आदेश व हुकुम<br>**प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव** | ४१-४५ |
| ११ | शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य<br>**प्रा. रमेश एस. पाटील** | ४६-४८ |
| १२ | शाहू महाराजांची सामाजिक व राजकीय सुधारणा : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. रामसिंग राज्या वसावे** | ४९-५२ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - ... IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# ७. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य

**प्रा. डॉ. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते**
मराठी विभाग प्रमुख, वि. वि. मं.चे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि. नंदूरबार.

**प्रस्तावना**

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना महाराष्ट्रातील करवीर म्हणजेच कोल्हापूरच्या संस्थानाचा राज्याधिकार दि. २ एप्रिल १८९४ रोजी प्राप्त झाला. शाहू महाराज कोल्हापूर संस्थानचे प्रागतीक अधिपती असून ते थोर समाज सुधारक होते. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा वारसा राजर्षी शाहू महाराज यांच्याकडे जातो. महात्मा फुलेंप्रमाणेच बहुजन समाजाच्या उद्धारासाठी अनेक लोकोपयोगी उपक्रम हाती घेतले. महाराष्ट्राच्या इतिहासातील अग्रगण्य समाज सुधारक म्हणून शाहू महाराजांना ओळखले जाते. त्यांनी सक्तीचे प्राथमिक शिक्षण, जातीभेद निवारण, अस्पृश्यता निवारण या सारख्या सामाजिक सुधारणांचा प्रत्यक्ष अवलंब केला. कोल्हापूर संस्थानात शिक्षण प्रसाराचे महत्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे 'कुर्मी क्षत्रीय संस्थेने' त्यांना ''राजर्षी'' ही पदवी बहाल केली. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा असा घेता येतो.

**राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य**

बहुजन समाज हा प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंपरा व चालीरीतींच्या विळख्यात अडकल्याने अज्ञानी, अंधश्रद्धाळू, अशिक्षीत, देवभोळा, अज्ञानी असल्याने दारिद्र्यात खितपत पडलेला होता. त्यापासून त्याला मुक्त करुन त्याची प्रगती करायची असेल तर बहुजन समाजाला शिक्षण दिल्याशिवाय त्याची प्रगती होणार नाही व ते आपली धार्मिक गुलामगिरीतून सुटका करु शकणार नाहीत. हे शाहू महाराजांनी ओळखले होते. शिक्षण हेच वैचारीक क्रांतीचे साधन असून समाजाला प्राथमिक शिक्षण दिले जावे यावर महाराजांनी भर दिला. त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सार्वत्रीक, मोफत व सक्तीचे करण्यासाठी कायदा पास केला. बहुजनांच्या शिक्षणासाठी अशा प्रकारचा कायदा करणारे कोल्हापूर संस्थान हे भारतातील पहिले संस्थान होते. प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक, उच्च व तंत्र शिक्षणालाही महाराजांनी महत्व दिले. राजाराम महाविद्यालयाचे महत्व व प्रतिष्ठा वाढवण्यासाठी प्रयत्न केले. महाराजांनी तांत्रिक शिक्षणाला महत्व दिले. मुलांसाठी तांत्रिक शिक्षण देण्यासाठी 'टेक्निकल इन्स्टिट्युट' सुरु करुन मुलांना लष्करी शिक्षण देण्याच्या हेतून एक 'इन्फंट्री स्कूल' सुरु केले. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील कारभार व्यवस्थित चालावा यासाठी प्रशिक्षीत तलाठी व पाटील निर्माण करण्यासाठी 'पाटील स्कूल' नावाची प्रशासकीय स्कूल सुरु केले. मुलांच्या शिक्षणासाठी हुशार व तज्ञ शिक्षक उपलब्ध व्हावेत यासाठी शिक्षकांना खास शिक्षण देण्यासाठी १९१२ साली 'शिक्षक प्रशिक्षण केंद्र' सुरु केले. त्यांनी आपल्या संस्थानात मुलींच्या शिक्षणात वाढ व्हावी यासाठी

मुलींसाठी शाळा सुरु केल्या व बहुजन समाजातील मुलींना शाळा व महाविद्यालयीन शिक्षणासाठी मोफत सोय करुन देऊन स्त्री शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले.

बहुजन समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गावात शाळा काढून ती सुस्थीतीत चालावी यासाठी १९१२ साली 'वतनदार शिक्षक' योजना सुरु करुन त्यातील अडचणी लक्षात घेऊन तिच्या ऐवजी १९१७ साली 'पगारी शिक्षक' योजना अंमलात आणली. गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी ग्रंथालयांना अनुदान देण्याची पद्धत सुरु करुन 'पुस्तक पेढी योजना' राबवली. तसेच विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृहे, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी व स्पर्धात्मक परीक्षा देण्यासाठी परदेशात पाठविण्यासाठी देखील शिष्यवृत्ती जाहीर केल्या. कोल्हापूर येथे सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वसतिगृह सुरु केले. या वसतिगृहाचा लाभ प्रामुख्याने ब्राह्मण विद्यार्थ्यांना झाल्याचे लक्षात आल्याने शाहू महाराजांनी जातीवार वसतिगृहे काढण्याचा निर्णय घेतला तसेच मागासलेल्या वर्गातील विद्यार्थिनींच्या राहण्या- जेवण्याची मोफत सोय १९१९ सालापासून दरबारातर्फे करण्यात आली. संस्कृत शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध योजना राबविण्यात आली. शाहू महाराजांनी मराठा विद्यार्थ्यांसाठी १९०१ मध्ये ''व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग'' सुरु केली. तसेच लिंगायत, वैश्य, चांभार, शिंपी, ढोर इ. जातीच्या विद्यार्थ्यांकरीता स्वतंत्र वसतिगृहे स्थापन केलीत. त्यांनी समाजामध्ये कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता बहुजन समाजातील म्हणजे ब्राम्हणेत्तर मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. हुशार व होतकरुं विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण देण्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात आल्याचे उत्तम उदाहरण म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन आपल्या चळवळीच्या वारसा त्यांनी दिला. अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण प्रसाराचे महत्वपूर्ण कार्य केले. या कार्यातून त्यांच्या विचार प्रगत असल्याचे निदर्शनास येते.

**राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य**

आपल्या देशाची संस्कृती फार प्राचीन आहे. भारतीय संस्कृतीची ओळख करुन घेतांना असे जाणवते की, या प्राचीन संस्कृतीत वेळोवेळी काही बदल घडलेले जाणवतात, असे असले तरी समाज व्यवस्था ही परंपरेने चालत आलेल्या धार्मिक रुढी परंपरा, चालीरीती, रीतीरिवाज यांच्या बंधनात अडकलेली दिसते. आपल्या देशावर वेळोवेळी जे काही परकीय आक्रमणे झालीत. त्यांचा प्रभाव त्यावेळी समाजावर पडलेला दिसतो. इंग्रजाचे राज्य स्थापन झाल्यावर समाज व्यवस्थेत व राज्य व्यवस्थेत मुलगामी बदल होऊ लागले. त्याप्रमाणेच समाजात काही बदल घडून आलेले दिसतात. त्याला कारण म्हणजेच इंग्रजांनी सुरु केलेली शिक्षण व्यवस्था होय. असे असले तरी समाजात असलेली जातीव्यवस्थेतील दरी खूप मोठी होती. उच्च - कनिष्ठ - बहुजन अशी वर्गवारी समाजात दिसून येत होती. ती दरी कमी करण्यासाठी प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यासारख्या थोर समाज सुधारकांनी अटोकाट प्रयत्न केलेत. त्यात राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा आढावा अनेक अंगाने घेता येईल.

आपल्या देशात वर्णव्यवस्था अस्तित्वात असल्याने स्पृश्य - अस्पृश्य, उच्च - कनिष्ठ - बहुजन अशी मानवतेला कलंक असलेली समाज व्यवस्था आहे. त्यातील अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे अशा विचाराने प्रेरीत होऊन शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य हाती घेतले. अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे असे मत ते निरनिराळ्या

सभा संमेलनात व्यक्त करीत असत. त्याविषयी फक्त बोलून किंवा ठराव करुन हा प्रश्न सुटणारा नाही तर त्यासाठी प्रत्यक्ष आचरण करुन शाहू महाराजांनी अस्पृश्योध्दाराचे कार्य हाती घेतले. मुख्य प्रवाहात अस्पृश्यांना आणण्यासाठी त्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळेल अशी व्यवस्था शाहू महाराजांनी केली.

१९०७ मध्ये अस्पृश्य मुलांसाठी कोल्हापूर येथे 'मिस क्लार्क वसतिगृह' सुरु करुन त्याठिकाणी त्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था केली. 'व्हिक्टोरिया वसतिगृह' हे जरी मराठ्यांच्या मुलांसाठी सुरु केलेले असले तरी त्यांच्यातच अस्पृश्य व मुस्लिम विद्यार्थ्यांची देखील सोय करुन दिली तसेच १९१९ मध्ये स्वतंत्र जातींसाठी असणाऱ्या शाळा बंद करुन स्पृश्य विद्यार्थ्यांच्या शाळेतच अस्पृश्यांना देखील समाविष्ट करण्याचा आदेश काढून शाळेत शिक्षकांनी अस्पृश्यता मानू नये व अस्पृश्यांना इतर मुलांप्रमाणेच वागवावे अशी आज्ञा केली. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये शैक्षणिक प्रसार झाला.

१८९४ मध्ये शाहू महाराजांनी गादीवर आले तेव्हा अस्पृश्य समाजाची संख्या सुमारे १ लाख होती. त्यांच्या शिक्षणाची गरज शाहू महाराजांना वाटली त्यासाठी महाराजांनी जे काही धोरण निश्चित केलेत ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. दि. २५ जुलै १९१७ रोजी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा निर्णय घेऊन दि. ४ मार्च १९१८ रोजी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

२. अस्पृश्यांसाठी असलेल्या शाळांच्या संख्येत वाढ केली ते सत्तेवर आले तेव्हा फक्त ५ शाळा होत्या. त्यांची संख्या २७ पर्यत वाढवून अस्पृश्य विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत दिली.

३. दरबारी खर्चातून ४ व खाजगी खर्चातून ३ अशी एकूण ७ वसतिगृहे महाराजांनी सुरु केलीत व या वसतिगृहांना भरीव आर्थिक मदत केली.

४. राजाराम हायस्कूल व कॉलेज मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश देण्याचा निर्णय घेऊन अशा विद्यार्थ्यांना ५ रुपये शिष्यवृत्ती देण्याची योजना तयार केली.

५. जातीवाचक आडनावे बदलण्याचा उपक्रम त्यांनी हाती घेऊन अस्पृश्यांना मराठे व ब्राह्मणांची आडनावे लावण्यास मुभा दिली.

६. दरबारातील मंडळीचे खाजगी नोकर म्हणून अस्पृश्यांना नोकऱ्या दिल्या त्यांचे स्वतःचे अंगरक्षक म्हणून महार जातीतील नेमले होते व मागासलेल्या लोकांसाठी ५० टक्के जागा नोकरीत राखून ठेवण्याचा आदेश काढला.

७. १९१८ साली महार वतने कायद्याने बंद केलीत.

८. फासेपारधी, गारुडी यासारख्या इंग्रजांनी गुन्हेगार ठरवलेल्या जातीतील लोकांची पोलीस ठाण्यावरील हजेरी बंद केली. ते म्हणत की, अशी कोणतीच जात गुन्हेगार नसते. त्यांच्या उत्थानासाठी अशा जातीतील लोकांना रोजगार देण्याची व्यवस्था त्यांनी केली.

९. गंगाराम कांबळे या महार जातीतील व्यक्तीस शहराच्या मध्यवस्तीत हॉटेल चालवण्यास आर्थिक मदत करुन स्वत: त्या हॉटेलात जाऊन चहा फराळ होत असत.

१०. शिक्षण, आरोग्य यासारख्या विभागात अस्पृश्यता पाळू नये असा नियम करुन आंतरजातीय विवाहास पाठिंबा दिला व अस्पृश्यता मानने हा कायद्याने गुन्हा ठरविला.

११. जातीवाद मिटवण्यासाठी शाहू महाराजांनी स्पृश्य - अस्पृश्यांमध्ये सहभोजने घडवून आणलीत.

१२. कोल्हापूरचे भवानी मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले.

१३. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्य व्यक्तिस तलाठी पदी नेमणूक केली.

१४. कोल्हापूर नगरपालिकेच्या अस्थायी समितीचे अध्यक्षपदी त्यांनी दत्तोबा पवार या दलित व्यक्तीची नेमणुक केली.

अस्पृश्योध्दाराच्या बाबतीत राजर्षी शाहू महाराजांनी केवळ विचारच मांडले नाहीत तर आपले विचार प्रत्यक्ष कृतीत आणले. अस्पृश्यांना समानतेचा अधिकार मिळावा त्यांचा विकास व्हावा यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न केलेत. निरनिराळ्या परिषदातून सामाजिक सुधारणांविषयी आपले परखड विचार मांडले. कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे त्यांनी अस्पृश्यांची परिषद भरवली. या परिषदेत स्वत: शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्यांच्या मुक्ती चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी प्रोत्साहन दिले. दिल्ली, नागपूर येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदांचे स्वत: अध्यक्षपद स्विकारून मार्गदर्शन केले.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे त्यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळेच दलित - पददलितांचा उध्दारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनमानसांत निर्माण झाली. या राजाने अज्ञानी, अशिक्षीत, बहुजन समाजाला जागृत करण्याचे जे व्रत घेतले ते अखेरपर्यंत सांभाळले. हे सामाजिक कार्य करतांना त्यांना उच्च वर्णियांशी प्रसंगी झगडावे लागले .तरीही ते मागे हटले नाहीत व अविरत कार्यरत राहिले. अखेरच्या दिवसांत त्यांचे द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने ते खचून गेले. तशातच त्यांना मधूमेहा सारख्या आजाराने ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि. ६ मे १९२२ रोजी वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी या महान समाज सुधारक छत्रपतींचे हृदय विकाराने निधन झाले.

**संदर्भ**

१. जयसिंगराव पवार - संपादक - राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ, कोल्हापूर - २००१.

२. कृ. गा. सुर्यवंशी - राजर्षी शाहू : राजा व माणूस, पुणे १९८४.